


राजेंद्र ओझा: चित्रपट नव्हे इंडस्ट्रीचा दिग्दर्शक

एकाही कलाकाराचा साधा पत्ताही माहीत नसलेले राजेंद्र ओझा आज इंडस्ट्रीतल्या मोठमोठ्या कलाकारांपासून तंत्रज्ञांपर्यंत सगळयांची इत्थंभूत माहिती सांगू शकतात.

□ विजय अकेला

मध्य प्रदेशातून राजेंद्र ओझा नावाचा एक १४ वर्षांचा पोऱ्या मुंबईत आला तेव्हा त्याच्या डोक्यात चित्रपटांचा दिग्दर्शक होण्याचं सोनेरी स्वप्न होतं. पण मुंबईला पोहोचल्यावर आपलं नशीब कुठे घेऊन जाणार आहे याचा त्याने स्वप्नातही कधी विचार केला नव्हता. दिग्दर्शक बनण्यासाठी राजेंद्र ओझांनी बराच संघर्ष केला. पडेल ते काम केलं. १९७१-७२ च्या दरम्यान राजश्री प्रॉडक्शनच्या *पिया का घर*साठी त्यांना प्रॉडक्शन कंट्रोलरचं काम मिळालं.

जुन्या दिवसांच्या आठवणींत रमत राजेंद्रजी सांगू लागले, 'चित्रपटांशी संबंधित प्रत्येक क्षेत्रातल्या लोकांशी माझा संबंध येत असे. पण त्यांच्याशी संपर्क साधणं यासारखं कठीण काम दुसरं नसायचं. लोकांचे पत्ते शोधून काढणं, फोन नंबर्स शोधणं यात दिवसच्या दिवस बिघडायचे. तसे प्रमुख कलाकारांचे नंबर्स प्रॉडक्शन हाऊसेसकडे असायचे. पण नवोदित, तंत्रज्ञ अशांशी संपर्क कसा साधायचा? ही अडचण वरचे वर जाणवू लागल्यावर इंडस्ट्रीशी संबंधित सगळ्या लोकांच्या पत्त्यांची माहिती देणारी डिरेक्टरी तयार करण्याचा विचार माझ्या मनात घोळू लागला. ही कल्पना मी काही परिचितांकडे मांडल्यावर बहुतेकांनी एकच प्रश्न विचारला, 'तुझी डिरेक्टरी कोण खरेदी करणार?'

थोडाफार असाच प्रतिसाद सगळीकडे मिळाल्यावर राजेंद्र ओझांनी आपला विचार गुंडाळून ठेवला. आज बी. आर. चोप्रांकडे तर उद्या मनोजकुमारकडे स्टोरी डिपार्टमेन्टकडे अशी त्यांची कामं सुरू झाली. पण मनात दोन गोष्टी कायम घर करून होत्या. पहिली दिग्दर्शक बनण्याची आणि दुसरी डिरेक्टरी बनवण्याची.

ते म्हणतात, 'इंडस्ट्रीत इतकी वर्षं राहिल्याने माझ्याकडे माहितीचा इतका साठा झाला होता की त्याचा इतरांना उपयोग व्हावा असं मला सारखं वाटायचं. मग मी विचार केला की मोठी नाही तर निदान एखादी छोटीशीच डिरेक्टरी प्रायोगिक तत्त्वावर काढून पाहिली तर? झालं, १९७२ पासून मनात दाबून ठेवलेल्या या विचाराने अखेरीस १९८०च्या दरम्यान जोरदार उसळी मारली आणि कलाकार-तंत्रज्ञ यांची माहिती देणारी एक छोटीशी पुस्तिका मी काढली. तिची किंमत होती अवघे सात रुपये.'

भीत भीत त्यांनी ती पुस्तिका छापली तर खरी, पण तिला मिळालेला प्रतिसाद नेमका उलट होता. दोनच महिन्यात हजारोंनी प्रती खपल्या. त्यामुळे राजेंद्र ओझांचा आत्मविश्वास दुणावला. १९८३ पर्यंत इंडस्ट्रीशी संबंधित प्रत्येक लहान-मोठ्या व्यक्तीचे पत्ते आणि फोन नंबर्सची माहिती देणाऱ्या छोट्या छोट्या तीन पॉकेट डिरेक्टरीज बाहेर काढल्यावर त्यांनी एक मोठी डिरेक्टरी बनवली. तिचं नाव ठेवलं, 'स्क्रिन वर्ल्ड ॲन्युअल.'

'तेव्हापासून आजपर्यंत मी त्या डिरेक्टरीत नियमित बदल करत आलोय. आजवर २३ आवृत्त्या छापल्या. दर वर्षी मी बदललेले पत्ते, फोन नंबर्स, नव्या कलाकारांचे पत्ते आणि माहिती, नव्या लेखक-दिग्दर्शक, तंत्रज्ञ, संकलक, गीतकार-संगीतकार, नृत्यदिग्दर्शक, अभिनयाचं प्रशिक्षण देणाऱ्या संस्था, बालकलाकार अशा कितीतरी जणांची माहिती यात दिलेली असते. अशी परिपूर्ण डिरेक्टरी काढण्यासाठी मला वर्षभर सतत काम करावं लागतं. काही जणांच्या मते ही डिरेक्टरी फक्त चित्रपट व्यवसायाशी संबंधित लोकांसाठीच असते. पण तसं नाहीये. २५ टक्के ग्राहक या इंडस्ट्रीबाहेरचे असतात.' पॉकिट साईज डिरेक्टरी ८०० रुपयांत तर ॲन्युअल १००० रुपयांत मिळते.

हिंदीप्रमाणेच मराठी, गुजराती, बंगाली, तामीळ, तेलगू या भाषांतील फिल्मी जगताची माहितीही डिरेक्टरीत समाविष्ट करण्यात येते.

हे काम फार डोकेदुखीचं असतं. इंडस्ट्रीवर प्रेम करणारा माणूसच ते करू शकतो. आणि राजेंद्र ओझांचं इंडस्ट्रीवर मनापासून प्रेम आहे. म्हणूनच ते नवी माहिती मिळवण्यासाठी अविरत कष्ट घेत असतात. 'मला त्यात अजिबात त्रास वाटत नाही. मध्य प्रदेशातील एका छोट्या गावातल्या शाळामास्तरांचा मी मुलगा. मुंबईत आलो तेव्हा हातात एकाही कलाकाराचा पत्ता नव्हता. मात्र आज उभी इंडस्ट्री मोठ्यापासून छोट्यापर्यंत सगळ्या कलाकारांच्या पत्त्यांसाठी माझी डिरेक्टरी विश्वासाने हाताळते. हेच माझं मोठं यश आहे असं मला वाटतं. मी जे मिळवलंय त्याबद्दल समाधानी आहे. मी मध्यंतरी ८० ग्लोरिवर्स इयर्स ऑफ हिंदी सिनेमा, नॅशनल फिल्म ॲवॉर्ड्स विनर्स नावाची पुस्तकंही संपादित करतो. यात आर्थिक फायदा जवळजवळ नगण्यच असतो. तरीही मी ते करतो, कारण मला पैशापेक्षाही मोलाची अशी एक गोष्ट त्यात मिळते ती म्हणजे मानसिक समाधान.'

राजेंद्र ओझा यांच्या या सिनेप्रेमाला काय म्हणावं?



राजेंद्रकुमारांच्या डिरेक्टरीचं प्रकाशन करताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख